कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/आराकप्र/२०२१-२२/२६४२
दि.२४/०२/२०२२

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित विद्यार्थी विभागातील स्पर्धात्मक स्वरुपाचे राज्य कला प्रदर्शन २२ ते २६ मार्च २०२२ दरम्यान संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालय, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यासाठी निर्धारित नमुन्यातील प्रवेशिका नियमावलीसह आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय येथील कला अकादमीच्या कार्यालयात ८ मार्च २०२२ पासून उपलब्ध असणार आहे. सदर प्रवेशिका आवश्यक त्या माहितीसह दि. १४ व १५ मार्च २०२२ रोजी सकाळी १०.०० ते १.०० वाजता व दुपारी २.०० ते ४.०० च्या दरम्यान संस्कृती भवन, कला व संस्कृती संचालनालय, पाटो-पणजी येथील आर्ट गॅलरीत (कला दालनात) स्वीकारण्यात येतील.

उपरोल्लेखित मुदतीनंतर आलेल्या अथवा अपूर्ण स्वरुपातील प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत याची इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळविले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)